## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ६७६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०९/२०१७

**१) बिना रॉयल्टी रेती भरुन रेतीसह ट्रॅक्टर घेवुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २८/०९/२०१७ चे १४.२० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी त्याचे ताब्यातील बिना नंबरचा ट्रॅक्टर टॉली मध्ये बिना रॉयल्टी रेती भरुन नेत असतांना पाठलाग करुन मिळुन आल्याने जप्ती कारवाई करुन ट्रॅक्टर ड्रायव्हरला ताब्यात घेवुन पोलीस स्टेशनला येत असतांना यातील आरोपी क्र. २ ट्रॅक्टर मालक याने कत्रांटी ट्रॅक्टरवर असलेल्या ड्रायवरला खाली उतरवुन १ ब्रास रेती किंमती ३,०००/—रु. रेतीसह ट्रॅक्टर घेवुन पळुन गेल्याने फिर्यादी सतीश गंगाधर आकोलवार वय ४५ वर्ष, रा. प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा मंडळ अधिकारी तहसिल कार्यालय भंडारा लेखी रिपोर्ट व कागपदपत्रावरुन वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,१८६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन लोखंडी साहित्याची चोरी . :—**

दिनांक २८/०९/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रवींन्द्र श्रीधर फटींग वय ४३ वर्ष, रा. छपरु नगर नागपुर यांचे बिल्डींग कंट्रकशन्स बांधकामा करीता ठेवलेले यातील आरोपीतांनी संगनमत करुन २० नग लोखंडी पिजरे किंमती २०,०००/—रु. चे चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३) शासकीय योजनेची फाईल जाळुन राख केल्याचे संशया वरुन गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/०७/२०१७ चे १०.०० ते १८.०० वाजता दरम्यान यातील अर्जदार प्रवीण प्रभाकर वझंलवार वय ५६ वर्ष, रा. डॉक्टर कॉलोनी बेला वरिष्ठ सहाय्यक यांनी तोंडी रिपोर्ट दिली की कोणीतरी अज्ञात ईसमाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्राणा कार्यालय भंडारा येथील लेखा शाखेतील शासकीय योजनेची फाईल जाळुन राख केल्याचे संशया वरुन व चौकशी अहवाला व सी. ए. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४३६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४) अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०९/२०१७ चे २०.३६ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे आपले स्टॉपसह तुमसर शहरात दिनांक २८/०९/२०१७ चे २०.२६ वाजता मोटार सायकलने पेट्रोलींग करीत असता स्टेट बॅक बजाज वार्ड समोरील अंधाऱ्या बोळीत यातील आरोपी हा अंधारात आपले अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे बेतात दिसुन आल्याने पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्याची अंग झडती घेतली असता त्याचे कडे एक लोखंडी कटावनी सलाख लांबी १४ इंच ग्रिप असलेली काळया रंगाची (घरफोडीचे हत्यार) मिळुन आल्याने पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हसकर पो.स्टे तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

५) विष प्राशन करुन औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—

दिनांक २७/०९/२०१७ चे ०६.१५ वाजता दरम्यान यातील मृतक श्रावण मोतीराम गाडेकर वय ६५ वर्ष, रा. पिपंळगाव निपानी दिनांक २२/०९/२०१७ ला विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचाराकरीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोलीस स्टेशन अडयाळ येथे प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि म्हैसकर पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २८/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १२१ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता